महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ,
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प./2954
दिनांक : २०.०१.२०२३

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय** : - माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी -मार्च २०२३ तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य वितरण तथा OMR गुण तक्ते भरणेबाबतच्या सूचना

या मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रुवारी -मार्च ला प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या भाषा अन्य विषयाच्या तोंडी परीक्षेसह विज्ञान व गणित , तंत्र व पूर्व व्यावसायिक, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक व अंतर्गत मुल्यमापनाची परीक्षा शुक्रवार दिनांक १०/०२/२०२३ ते बुधवार दिनांक ०१/०३/२०२३ या कालावधीत तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यानुभव विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २७/०३/२०२३ ते ०८/०४/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

*** **प्रात्यक्षिक,तोंडी,प्रकल्प अंतर्गत विषय गुणतक्ते भरण्याबाबतच्या सूचना** ***

फेब्रुवारी-मार्च २०२३ प्रात्यक्षिक ,अंतर्गत,तोंडी [ Practical/internal/oral] परीक्षेसाठी OMR या पध्दतीचे गुणतक्ते देण्यात येत आहेत . सदरहू गुणतक्ते भरताना Scanning योग्य रितीने होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) प्राप्त गुण बैठक क्रमांक (Seat No) समोर दिलेल्या चौकटीतच सुवाच्य अक्षरात भरावे आणि प्राप्तगुणांप्रमाणे त्या समोरील वर्तुळ काळया/निळया (Bule/Black Ink) शाईने भरावे. त्याप्रमाणेच प्रत्येक पानाच्या शेवटी एकूण गुणांची बेरीज व त्यासमोरील वर्तुळ भरावयाचे आहे.

२) बारकोडवर काहीही लिहू नये. तसेच सही किंवा शिक्का मारू नये.

३) NSQF अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयाच्या X१ ते X४, X६ ते X९, ९५,९७,९८ तसेच NSQF अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयाच्या X१, ९१, ९२ व ९३ विषयांच्या परीक्षा काही शाळांमध्ये व काही शाळातील शासकीय तंत्र विद्यालयामध्ये आयोजित केली जाते. **ज्या शाळांची परीक्षा शासकीय तंत्र शाळांमध्ये आयोजित केली जाते त्यांनी त्यांच्या OMR गुणपत्रिका व उत्तरपत्रिका शासकीय तंत्र शाळेमध्ये जमा करुन त्यांच्या मार्फत परीक्षेचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर त्यांना दिलेल्या OMR गुणपत्रिका व उत्तरपत्रिका आपल्या शाळेमध्ये जमा करून घ्याव्यात. OMR गुणपत्रिका व उत्तरपत्रिका पाकीट सिलबंद करून निर्धारित तारखेस मंडळास जमा करावे**

४) OMR शीट फोल्ड अथवा स्टेपल करू नये. तसेच OMR गुणपत्रिकेमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये. OMR SHEET अनुक्रमांकानुसार लावून त्यासाठी मंडळाने दिलेल्या पाकीटातच भरून जमा करावयाच्या आहेत.

...२

५) **अत्यंत महत्वाचे :** परीक्षेसाठी अतिविलंबाने फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त बैठक क्रमांक [ Additional Seat No.] दिलेला आहे. या बैठक क्रमांकाची तसेच ऐनवेळी विषय बदल दुरुस्ती करुन घेतलेल्या बैठक क्रमांकाची नोंद OMR SHEET वर येत नाही. सबब अशा बैठक क्रमांकासाठी त्या-त्या विषयाप्रमाणे शाळेच्या लेटर हेडवर [** खाली दिलेल्या नमुन्याप्रमाणे ] स्वतंत्ररित्या गुणतक्ते तयार करुन विषय शिक्षक व मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीसह OMR SHEET त्याच पाकीटात भरुन जमा करावयाचे आहेत.

**अतिरिक्त बैठक क्रमांक अथवा विषय बदल**

**** शाळेच्या लेटर हेडवर स्वतंत्ररित्या गुणतक्ते तयार करावयाचा नमुना**

| माध्यमिक शाळा क्रमांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | विषयाचे नाव | विषय सांकेतीक क्रमांक | बैठक क्रमांक | मिळालेले गुण | |
| | | | | अंकात | अक्षरात |
| १ | | | | | |
| २ | | | | | |

**प्रात्यक्षिक परीक्षा झालेनंतर वरील सर्व सूचनांसह परीक्षेचे सर्व साहित्य त्या-त्या जिल्हयाच्या वितरण केंद्रावर शुक्रवार दिनांक ०३ मार्च २०२३ रोजी जमा करावयाचे आहे. याबाबत सर्व शाळाप्रमुखांनी दक्षता घ्यावयाची आहे.**

[ पोवार डी.एस.]
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रत माहितीसाठी
**सर्व जिल्हा वितरण केंद्रप्रमुख यांना..**

वरीलप्रमाणे शाळांकडून जमा होणारे साहित्य शाळा क्रमांकनिहाय लावून शनिवार दिनांक ०४ मार्च २०२३ रोजी आपल्या केंद्रावर येणा-या मंडळाच्या प्रतिनीधीकडे दयावयाचे आहे.त्यानंतर केंद्रप्रमुखांनी सदरहू साहित्य शाळानिहाय मंडळात समक्ष जमा करणेसाठी विभागीय मंडळ कोल्हापूर कार्यालयात **सांगली व सातारा जिल्हा वितरण केंद्रप्रमुखानी सोमवार दिनांक ०६ मार्च २०२३ रोजी आणि गडहिंग्लज , कासारवाडा व आळते वितरण केंद्रप्रमुखानी मंगळवार दिनांक ०७ मार्च २०२३ सकाळी ११ वाजता न चूकता उपस्थित रहावयाचे आहे.**